क्रमांक : १२५

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

### गुरुवार, दिनांक ०५ ऑक्टोबर, २०२३ / आश्विन १३, १९४५ (शके)

### लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**१२५.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या प्रथम सत्रातील एकूण ३८८ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी २८ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती. एकूण प्रलंबित ३६० निवेदनांपैकी १६२ निवेदने मा. सदस्यांना पत्रक भाग-२ व्दारे सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ रोजी वितरीत करण्यात आली. एकूण १९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १८ निवेदने सोमवार, दिनांक २९ मे, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६४ व्दारे मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. १८० प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३५ निवेदने सोमवार, दिनांक १२ जून, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ६८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. त्यापैकी १४५ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ३३ निवेदने सोमवार, दिनांक ३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७४ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. एकूण ११२ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी १४ निवेदने सोमवार, दिनांक १३ जुलै, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक ७९ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. तसेच, ९८ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ४१ निवेदने सोमवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२ क्रमांक १२२ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली होती. आता एकूण ५७ प्रलंबित लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ०७ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : ०५ ऑक्टोबर, २०२३**

याची प्रत :

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन शाखा

नगर विकास विभाग/नवि-२६

लक्षवेधी सूचना क्र. ७११

श्री. विकास ठाकरे, श्री. अमिन पटेल, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. सुनिल केदार, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७११ पुढीलप्रमाणे आहेः-

"नागपूर महानगरपालिकेत मागील २० वर्षापासून कार्यरत १८९ कंत्राटी संगणक चालकांची सेवा संपुष्टात आणून नवीन कंत्राटदाराची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव आणणे, सद्यस्थितीत या कर्मचाऱ्यांना किमान वेतन अधिनियम १९४८ च्या तरतुदीनुसार सरासरी रक्कम २०६६६ रुपये वेतन भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी आरोग्य विमा या सुविधा मिळत असणे, सध्या मनपाच्या कामकाजाचा बोजा याच कर्मचाऱ्यांवर असणे, मात्र आता मनपाने नवीन कंत्राटदार नियुक्तीचा प्रस्ताव आणून त्यात संगणक चालकांना दरमहा १५,५०० रुपये मानधन प्रस्तावित केले असणे, नियमानुसार ते किमान वेतनात बसत नसणे, हा कार्यरत संगणक चालकांवर अन्याय असणे, त्यामुळे ते आंदोलन करीत असणे, मागील १५ ते २० वर्षापासून सेवा देत असलेल्या या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वय ४० ते ५० वर्षे झाले असणे, अशा परिस्थितीत त्यांना बेरोजगार करणे योग्य नसणे, त्यामुळे त्यांना सध्या मिळत असलेल्या मनधनावर त्यांना फेरनियुक्ती देण्यात यावी, अशी मागणी असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या संगणक चालकांत पसरलेला असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

---

मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

नागपूर महानगरपालिकेने कंत्राटी स्तरावर संगणक चालकांची नियुक्ती केलेली नसून बाहय यंत्रणेमार्फत संगणक चालकांचा पुरवठा करण्यात येत आहे. त्यानुसार सद्यस्थितित मे. जे. ॲन्ड जे. कन्सलटींग सर्विसेस, नागपूर या खाजगी बाहय ऐजन्सी मार्फत वेळोवेळी आवश्यक संख्येनुसार सन २०१२ पासुन संगणक चालक पुरविण्यात येत आहेत. तथापि मागील २० वर्षापासुन १८९ संगणक चालक कंत्राटी पध्दतीने महानगरपालिकेत कार्यरत आहेत, ही बाब वस्तुस्थिती धरुन

नाही. सन २०१२ मध्ये उक्त बाहय यंत्रणेमार्फत सुरवातीला १०० संगणक चालक पुरविण्यात येत होते. तसेच वेळोवेळी आवश्यकतेनुसार संगणक चालकांच्या संख्येत बदल करण्यात आला आहे.

साधारणतः ३ वर्षापासुन १८९ संगणक चालक बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येत आहे. मे. जे. ॲन्ड जे. कन्सलटींग सर्विसेस, नागपूर या बाहय ऐजन्सीचा कार्यकाळ संपुष्टात आल्यामुळे आणि या संबंधात स्थायी समिती ठराव क्र. ४३, दि. ३० जुलै, २०२१ च्या अनुषंगाने "कम्प्युटर मॅनेजर" पुरविण्याबाबत निविदा प्रक्रियेची कार्यवाही सध्या सुरु आहे.

सदर निविदा प्रक्रीयेबाबत सद्यस्थितीत बाहय यंत्रणेमार्फत पुरवठा करण्यात येत असलेल्या संगणक चालकांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे याचिका क्र. ७४५२/२०२२ दाखल केली आहे. सदर याचिकेमध्ये महानगरपालिकेने दि. १५ नोव्हेंबर, २०२२ रोजी प्रसिध्द केलेल्या निविदा प्रक्रीयेस स्थगीती देण्याची मागणी केली आहे. सदर प्रकरण सद्यस्थितीत न्यायप्रविष्ट आहे. तथापि सदर याचिकेत मा. उच्च न्यायालयाच्या दि.०२ डिसेंबर, २०२२ रोजीच्या आदेशान्वये सदर निविदा प्रक्रीयेला स्थगिती नाकारली आहे. त्यामुळे निविदेसंदर्भात आवश्यक कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

*******

लक्षवेधी सुचना क्र.१४३७

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. रईस शेख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४३७ पुढील प्रमाणे आहे-

"भिवंडीमध्ये मागील काही आठवड्यांमध्ये तीन वर्षीय दोन अल्पवयीन मुलींच्या लागोपाठ हत्या होणे, अल्पवयीन मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न अधिकच ऐरणीवर येणे, त्यामुळे भिवंडी शहर हे पूर्णपणे हादरलेले असणे, तसेच सदर प्रकरणातील आरोपींचा अद्याप शोध लागलेला नसणे. गेल्या काही दिवसांमध्ये ठाणे पोलिस आयुक्तालयांच्या हद्दीत अजाण बालकांबाबत घडलेल्या हत्या, लैंगिक अत्याचार आणि अपहरणाच्या घडलेल्या गंभीर घटनांमुळे पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले असणे, काही वर्षापूर्वी भिवंडीमध्ये आठ वर्षाच्या बालकाचे अपहरण करून त्याच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना घडलेली असणे, अशा प्रकारच्या घटना वारंवार घडणे, सदर प्रकारच्या घटनांवर पायबंद आणणेकामी लोकप्रतिनिधी या नात्याने संबंधित विभागास वारंवार सुचना केलेली असणे, त्याअनुषंगाने प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करणे आवश्यक असणे, तसेच पालकांमध्येही जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावे, भिवंडी शहरात वाढत्या गुन्हेगारीचे बदलते स्वरूप पाहता धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना".

---

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

फिर्यादी व त्याची पत्नी कामाकरीता गेले असता मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने पळवून नेवून तिचेवर अत्याचार करुन तिला जिवे ठार मारल्याने फिर्यादीचे फिर्यादीवरुन शांतीनगर पोलीस स्टेशन, भिवंडी, ठाणे येथे दि.२५.०१.२०२३ रोजी गु.र.क्र.६५/२०२३, भादवि., कलम ३६३, ३०२, ३६६ (अ) ३७६, ३७६(अ) (ब), ३७६ (जे), ३७७ सह पोक्सो कलम ४, ६, ८, ९(एम), १२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

पिडीत मुलीस फिर्यादी यांच्या कायदेशीर रखवालीतून पळवून नेवून तिच्या बालमनाचा गैरफायदा घेवून तिच्यावर अत्याचार केल्याने निजामपुरा पोलीस ठाणे, भिवंडी, ठाणे येथे दि.२२.०१.२०२३ रोजी गु. र.नं.१४/२०२३ भा.द.वि., कलम ३६३ वाढीव कलम ३६६ (अ), ३७६ अ, ३७६ अब, ३७६ (आय जे),३०२ तसेच पोक्सो कलम ४, ६, ८, १२, १४(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आले आहे. सदर प्रकरणी मा. न्यायालयत दि.१३.०२.२०२३ रोजी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

भिवंडी पोलीस ठाण्याचे हद्दीत आठ वर्षाच्या बालकाचे अपहरण करुन त्याच्यावर अत्याचार करण्यात आल्याच्या घटनेबाबत निजामपुरा पोलीस स्टेशन, भिवंडी, ठाणे गु.र.नं.९३/२०१९ भा.द.वि., कलम ३६३, वाढीव कलम ३७७, ३४२ सह पोक्सो कलम ८, १२ प्रमाणे दि.२९.०३.२०१९ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीस अटक करुन आरोपीताविरुध्द दि.२७.०५.२०१९ रोजी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

भिवंडी मधील सर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीत लहान मुलांच्या हत्या, लैगिंक अत्याचार आणि अपहरणाच्या घडलेल्या घटनांची फिर्यादी यांनी पोलीस ठाण्यात येवून तक्रार दिल्यास तक्रारीची तात्काळ नोंद करुन तपास करण्यात येतो. तसेच परिमंडळातील पोलीस ठाणे हद्दीत लहान बालकांचे अपहरणाबाबत पालकांची कॉर्नर मिटींग घेवून परिसरातील लहान मुलांचे अपहरणास कसा आळा घालता येईल याबाबत जनजागृती करण्यात येते.

भिवंडी शहरात शाळा, कॉलेज, महाविद्यालयात जावून महिलांसंबंधित गुन्हे, महिलांची स्वयं सुरक्षितता, महिलांचे हक्क, चैन स्नॅचिंगचे प्रकार घडू नये याकरिता घ्यावयाची दक्षता, पोलीस मदतीसाठी डायल ११२ बाबत माहिती देण्यात आली. तसेच शालेय विद्यार्थी व विद्यार्थीना गुड टच - बॅड टच, सायबर क्राईम, स्वसंरक्षणाबाबत महिती देण्यात येवून जनजागृती करण्यात आलेली आहे. तसेच पोलीस ठाणे हद्दीत लहान बालकांचे अपहरणाबाबत पालकांची कार्नर मिटींग घेवून परिसरातील लहान मुलांचे अपहरणास कसा आळा घालता येईल याबाबत जनजागृती करण्यात येते.

राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षतेसाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे. प्रत्येक पोलीस ठाण्यात महिला मदत कक्ष स्थापन करण्यात आले आहे. महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी या उपाययोजना करण्यात येत आहे. राज्यात २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आले आहेत. महिला हेल्पलाईन क्र. १०३, १०९१, ११२ कार्यरत असून त्याद्वारे महिलांना २४*७ मदत देण्यात येते. पिडित महिलेला मनोधैर्य योजनेंतर्गत आर्थिक मदत दिली जाते.

•

---

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

श्री.रवि राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना :- १८२३

" सहसंचालक हिवताप हत्तीरोग जलजन्य रोग पुणे या सार्वजनिक आरोग्य विभागातील वरिष्ठ वैज्ञानिक अधिकारी प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदाच्या वेतन तफावमद्ये त सुधारणा करण्याबाबत तसेच या पदाचा पदश्रृखंलेत बदल करण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे शासनाच्या संबंधित विभाग प्रधान सचिव तसेच मुख्य सचिवाकडे मा. आरोग्य मंत्री, उप मुख्यमंत्री वित्त मंत्री, मुख्यमंत्री यांच्या कडे व माननीय राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्याकडे वारंवार पाठपुरावा केला असूनही दिनांक १३ फेब्रुवारीला २०२३ रोजी प्रकाशित केलेला अ बक्षी समितीच्या अहवालामध्ये खंड २मद्ये वरील मागणी चा समावेश नसल्याचे दिसून येत नसणे. यानंतर राजभवन सचिवालय राज्यपालाचे अवर सचिव (प्रशासन) यांनी उप सचीव सा. आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांना पत्र क्र.५५१४८०६दिनांक ०९फेब्रुवारी २०२३ रोजी पत्र पाठवून तातडीने निर्णयात्मक आदेश घेण्याबाबत कळविले असणे तसेच मुख्यमंत्री सचिवालय कक्ष अमरावती विभाग विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक ५१/२०२३ दिनांक २१/०२/२०२३ रोजी वरील लोकप्रतिनिधी यांच्या शिफारशीनुसार वरील बाबीचा विचार करून विशेष बाब म्हणून सभागृहाला आसलेल्या विशेष अधिकारानुसार वरील विषयात होत असलेला पाठपुरावा तरीही बक्षी समितीचे खंड २ मद्ये मागणी मान्य झाली नसणे हि बाब बघता विधिमंडळ सभागृहाने वरीप्रमाणे मागणी मान्य करण्यासाठी तातडीने निर्णयात्मक आदेश व या संबंधाने शासनाने करावयाची कारवाई व या संबंधाने शासनाची भूमिका व प्रतिक्रिया "

*******************************

### मा. उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांनी करावयाचे निवेदन

केंद्र शासनाने केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्य शासनाच्या धोरणानुसार केंद्र शासनाच्या वेतनश्रेणीचा अभ्यास करुन राज्य शासकीय व पात्र कर्मचाऱ्यांच्या वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाकडून “राज्य वेतन सुधारणा समिती” ची स्थापना करण्यात येते. सदर समितीकडे केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील केंद्र शासनाचे निर्णय विचारात घेऊन सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करणे तसेच निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतन निश्चिती व अनुषंगिक बाबींसंबंधी शिफारशी करणे या बाबी सोपविण्यात येतात.

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने वेतनसुधारणेसंदर्भात शिफारशी करण्यासाठी राज्य शासनाने श्री. के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन केली होती. सदर समितीच्या कार्यकक्षेत सातव्या वेतन

आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतनसंरचनेची शिफारस करणे आणि सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनसंरचनेत त्रुटी असल्यास त्या दूर करण्याबाबत शिफारशी करणे, या दोन बाबी प्रामुख्याने अंतर्भूत होत्या.

त्यानुषंगाने विविध संघटना, अधिकारी-कर्मचारी, तसेच प्रशासकीय विभागांना वेतनत्रुटी/ वेतनवृध्दीविषयक मागण्यासंदर्भातील प्रस्ताव ऑनलाईनरित्या बक्षी समितीच्या विचारार्थ सादर करण्यासाठी स्वतंत्र ऑनलाइन वेबपोर्टल (https://www. mahaseventh pay.in) तयार करण्यात आले होते. त्या अनुषगाने सदर पोर्टलवर ऑनलाईन विविध संवर्गाच्या एकूण ३७३९ मागण्या समितीस प्राप्त झाल्या होत्या.

बक्षी समितीने सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्यासंबंधीचा आपला अहवाल खंड-१ दिनांक ०५ डिसेंबर, २०१८ रोजी शासनास सादर केला होता. सदर अहवालातील शिफारशींवर मंत्रिमंडळाने निर्णय घेऊन दिनांक ३० जानेवारी, २०१९ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. तसेच बक्षी समितीने आपला विविध संवर्गाचा वेतनत्रुटींसंबंधीचा शिफारशींचा अहवाल खंड-२ शासनास दिनांक ८ फेब्रुवारी,२०२१ रोजी सादर केला होता. बक्षी समितीने आपल्या अहवालात प्राप्त एकूण ३७३९ मागण्यापैकी, १०४ संवर्गाच्या वेतनत्रुटीसंदर्भातील मागण्या मान्य केल्या आहेत.

MAHARASHTRA STATE LABORATORY SCIENTIFIC OFFICER CENTRAL UNION (MALARIA & FILARIA) (महाराष्ट्र राज्य प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी मध्यवर्ती संघटना (मलेरिया आणि फाइलेरिया) व इतर संघटनांनी बक्षी समितीसमोर "प्रयोगशाळा तंत्रज्ञ" या संवर्गाच्या वेतनत्रुटींबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. परंतु समितीने तिच्या अहवालामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागातील " प्रयोगशाळा तंत्रज्ञ" या संवर्गाच्या वेतनत्रुटीं निवारणासंदर्भात शिफारस केलेली नाही. बक्षी समितीच्या सदर अहवालातील शिफारशींवर दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात येऊन, त्याबाबतचा शासन निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

******************************

लक्षवेधी सूचना क्र.२२७४

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री. राजु आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"ठाणे जिल्हयातील ठाणे व भिवंडी तालुक्यांतील मौजे लाखिवली व इतर गावांमध्ये वारस लावताना पुर्वीच्या कुटूंबप्रमुखाने इतर भाऊबंधकींचे मुळ वारस व सामाईक खातेदारांचे नांवे लपुन प्रतिज्ञापत्रावरून फेरफार नोंद करून तलाठी व मंडळ अधिकारी यांची दिशाभूल केल्याचे शेतजमिन मिळकतीबाबत दि.१३/१२/२०२१ रोजी रोहिदास तरे यांनी जिल्हाधिकारी ठाणे व प्रधान सचिव, महसुल विभाग यांना तक्रार दाखल केली असणे, भिवंडी तालुक्यातील मौजे कामतघर येथील वारसांचा फेरफार क्र. १७०२ वारसांनी नोंदवून नंतर लगेच बनावट सही करुन बनावट जबाब नोंदवून फेरफार क्र. १७०२ एकाच दिवशी अगुणवत्तेच्या व अनियमिततेवर दोन फेरफारामध्ये पंधरा दिवसाची नोटीस अवधी न ठेवता फेरफार मंजुर झाल्याने तलाठी व मंडळ अधिकारी यांनी त्यांचा पदाचा गैरवापर करुन खोट्या जबाबातुन गैरव्यवहारातून १७०३ या फेरफाराची नोंदणी घेतल्याने सदर फेरफार रद्द करून त्यापुढील फेरफार रद्द करणेकामी पुर्नविलोकन करण्यासाठी मा. उपविभागीय अधिकारी, भिवंडी.यांना दि. १८/१/२०२१ रोजी शकुंतला चौधरी यांनी तक्रारी दिलेली असणे, वारस फेरफारांच्या नोंदी घेते वेळेस कुटूबप्रमुख यांनी प्रतिज्ञापत्रत तलाठीसमक्ष सादर करतांना भा.द.वि. संहिता कलम १९८, १९९, २०० व १९३२ मधील तरतूदीनुसार दंडास शिक्षेस पात्र राहील असे प्रतिज्ञापत्र नोटरी करून दिलेले असणे, व असे प्रतिज्ञापत्रावरून फेरफार झाल्याने सदर प्रतिज्ञापत्राचा कायदेशीर भंग झालेला असल्यामुळे वारसामंध्ये वाद निर्माण होऊन संपुर्ण राज्यात भाऊ-बहिणीचे कायदेशीर वारस जमिन प्रकरणांमध्ये न्यायालयीन बोजा वाढलेला असणे, सदर प्रतिज्ञापत्रावरुन वारस डावलून झालेला फेरफार पुर्नविलोकनाखाली रद्द करणे कायदेशीर होईल त्यामुळे खरे वारसांची योग्य चौकशी होऊन योग्य फेरफार झाल्यास वारसांमध्ये वाद निर्माण होऊन न्यायालयीन गुंतागुंती व प्रक्रिया न वाढवण्यासाठी शासन स्तरावरती धोरणात्मक निर्णय घेऊन शासनाने गंभीररीत्या करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

---

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

श्रीमती शकुंतला चौधरी यांचे कुलमुखत्यारी श्री. रोहिदास हरिश्चंद्र तरे यांनी मौजे कामतघर, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.क्र. १३५/२ पैकी सर्व जमिनीचे फेरफार क्र. १७०२ व १७०३, दिनांक ०८/०१/१९७६ रोजी एकाच दिवशी वारस चढवून वारस कमी केल्याने सदर फेरफाराचे पुर्नविलोकन होणेबाबत विनंती केली होती. अर्जदार यांनी सदर अर्जामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५५ नुसार कार्यवाही करणेबाबत विनंती केली असल्याचे दिसुन येते. मात्र सदरचे प्रकरण पहाता, सदरची बाब हस्तदोषाची दिसुन येत नाही, त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १५५ ची तरतुद लागू होत नाही.

मौजे कामतघर येथील फेरफार क्रमांक १७०२, दि. ०८/०१/७६ अन्वये श्री. रघुनाथ गोविंद तरे यांचे मृत्यूपश्चात वारसाने १) अशोक रघुनाथ तरे, २) शकुंतला लक्ष्मण चौधरी, ३) मथुरा मारुती गायकवाड, ४) ताराबाई मधुकर कारभारी, ५) सुमित्रा रघुनाथ तरे यांचे नावाची नोंद करणेत आली आहे. फेरफार क्र. १७०२ हा दि. ०८/०१/१९७६ रोजी नोंदविण्यात येवून दि. २६/०१/१९७६ रोजी हा मंजूर करण्यात आला आहे. फेरफारांचे शेरेकोष्टकी वारस पंचनामा पाहिला नोटीस लागू मंजूर असा शेरा लिहून नोंद मंजूर केली असल्याचे दिसून येत आहे.

मौजे कामतघर येथील फेरफार क्रमांक १७०३ अन्वये फेरफार क्र.१७०२ मधील वारस १) शकुंतला लक्ष्मण चौधरी २) मथुरा मारुती गायकवाड ३) ताराबाई मधुकर कारभारी ४) सुमित्रा रघुनाथ तरे यांनी कबुली जबाब दिल्याने त्यांची नावे कमी करण्यात आलेली आहेत. सदरचा फेरफाराचे शेरेकोष्टकी कबुली जबाब पाहिला नोटीस लागू नोंद मंजूर असा शेरा लिहून नोंद मंजूर केली असल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुत दोन्ही फेरफार हे ०८/०१/१९७६ रोजी नोंदवून दि. २६/०१/१९७६ रोजी मंजूर करण्यात आल्याचे दिसून येत आहे. तसेच सर्व संबंधितांना नोटीस लागू केल्याचे शेरेकोष्टकी लिहिलेल्या शेऱ्यावरुन दिसून येत आहे. सबब, सदरचे फेरफार हे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम १४९ व १५० चे तरतुदीनुसार प्रमाणित केल्याचे दिसून येत आहे.

उक्त फेरफारांची नोंद झालेनंतर सदर मिळकतीबाबत एकुण २४ फेरफार मंजुर झालेले आहेत. सदरचे फेरफार वारस नोंदी व खरेदी व्यवहाराबाबत आहेत. सदर फेरफार व खरेदीदस्त आजरोजी अस्तित्वात आहेत. सबब, सदरचे फेरफार नोंदविताना सकृतदर्शनी कोणतीही अनियमितता दिसून येत नाही. फेरफार क्रमांक १७०२ व १७०३ या फेरफारास ४५ वर्षाचा कालावधी लोटलेला असुन तदनंतर खरेदीने, वारसाने अनेक त्रयस्थ हितसबंध निर्माण झालेले असल्यामुळे सदर फेरफाराबाबत आक्षेप असल्यास सबंधितांनी महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ चे कलम २४७ व २५७ अन्वये सक्षम न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे. तसेच ठाणे व भिवंडी तालुक्यातील लक्षवेधी मधील नमूद इतर गावांची माहिती प्राप्त करून उचित कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

*******

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १०३०

श्रीमती सरोज आहिरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १०३० पुढीलप्रमाणे आहे.

"नाशिक जिल्ह्यातील आदिवासी भागातील जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना रस्ते, पाणी, निवारा, वीज यांसारख्या मुलभूत सुविधा पुरविण्याबरोबर आरोग्य व शैक्षणिक दर्जाही कायम राखण्यासाठी पेसा कायद्याची १,४८२ गावांमध्ये अंमलबजावणी करण्यात आलेली नसल्याची बाब नुकतीच उघडकीस आलेली असणे, दिनांक १८ जानेवारी, २०२३ वा त्यासुमारास घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत ५७५ ग्रामपंचायतींनी अद्याप पेसा क्षेत्रातील गावांचे विकास आराखडेच तयार केले नसल्याने तेथील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष, नाशिक जिल्ह्यातील नाशिक, इगतपुरी, पेठ, त्र्यंबकेश्वर, सुरगाणा, दिंडोरी, कळवण, बागलाण व देवळा या तालुक्यातील एकूण लोकसंख्येत आदिवासी समाजाची लोकसंख्या अधिक असल्यामुळे अनुसूचित जमाती क्षेत्र म्हणून हे तालुके घोषीत करण्यात येणे, यासंदर्भात चौकशी करुन या ९ तालुक्यांतील १,४८२ गावांमध्ये 'पेसा' कायद्याची अंमलबजावणी करण्यास अपयशी ठरलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची तसेच 'पेसा' कायद्याची अंमलबजावणी त्वरीत करण्याबाबत तेथील लोकप्रतिनिधींची व जनतेची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.."

मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे निवेदन

पंचायत समिती, नाशिक, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर पेठ, दिंडोरी, सुरगाणा, कळवण, बागलाण व देवळा येथील सर्व पेसा ग्रामपंचायतींनी पेसा गाव निहाय पेसा उपक्रमाचे विकास आराखडे (अ) पायाभूत सुविधा, ब) वन हक्क अधिनियम (FRA) व पेसा (PESA) कायद्याची अंमलबजावणी, क) आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, ड) वनीकरण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनतळी, वन्यजीव पर्यटन व वन उपजिविका) या चारही बाबींनुसार तयार केले असून पंचायत समिती स्तरावर ग्रामपंचायत निहाय एकत्रित करून तालुका तांत्रिक छाननी समितीद्वारे छाननी व तपासणी पूर्ण करण्यात आली असून अहवाल शासनास सादर करणेबाबत तालुका स्तरावरून कार्यवाही सुरु असल्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी कळविले आहे.

अ) महाराष्ट्र राज्याचे अनुसूचित क्षेत्र घोषित शासनाकडील विधी व न्याय मंत्रालयाची असाधारण अधिसूचना मा. राष्ट्रपती महोदय, यांच्याकडील दिनांक २ डिसेंबर १९८५ भाग - २, खंड ३, उपखंड - १, क्रमांक - ५२१ व महाराष्ट्र शासन, आदिवासी विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. टीएसपी / १०८६/८७१०/प्र.क.३१/ का.५, दि. ०९ मार्च १९९० नुसार जिल्ह्यातील पेठ, सुरगाणा व

कळवण हे ३ तालुके पूर्ण अनुसूचित क्षेत्र घोषित असून उर्वरित नाशिक इगतपुरी, दिंडोरी व बागलाण हे ४ (चार) तालुके अंशत: अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहेत.

ब) इगतपुरी, पेठ, नाशिक या तीन तालुक्यातील काही गावांचा समावेश करून दि. २५ मे १९९९ रोजीच्या महाराष्ट्र शासन, राजपत्र, महसूल व वन विभाग या अधिसूचनेव्दारे नवीन त्र्यंबकेश्वर तालुका घोषित करण्यात आले आहे.

(क) मालेगाव, बागलाण, कळवण, या तीन तालुक्यातील काही गावांचा समावेश करून दि. २३ जून १९९९ रोजीच्या महाराष्ट्र शासन, राजपत्र, महसूल व वन विभाग या अधिसूचनेव्दारे नवीन देवळा तालुका घोषित करण्यात आले आहे.

उपरोक्त ९ तालुक्यांतील १४८२ गावांमध्ये पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. नाशिक जिल्ह्यातील अनुसूचित क्षेत्रातील पेसा कायद्याच्या अंमलबजावणी अनुषंगाने पंचायत समिती, नाशिक, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, पेठ दिंडोरी, सुरगाणा, कळवण, बागलाण व देवळा येथील पेसा ग्रामपंचायती व पेसा गावांमध्ये पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

********************

H-1227-1A

महाराष्ट्र विधान सभा
पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन २०२३
लक्षवेधी सूचना क्रमांक २०१

मा. श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार , श्री. अस्लम शेख, ~~श्री. विजय वडेट्टीवार~~, श्री. अबू आजमी, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"पूर्व उच्च प्राथमिक म्हणजेच इयत्ता पाचवी आणि पूर्व माध्यमिक म्हणजेच इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जात असणे, सन २०२२ च्या जुलै महिन्यात झालेल्या परीक्षेचा निकाल ३ जानेवारी २०२३ ला जाहिर करण्यात येणे, त्यात पाचव्या वर्गातील १६ हजार २३२ आणि आठव्या वर्गातील १२ हजार ९३९ असे २९ हजार १७१ विद्यार्थी शिष्यवृत्तीला पात्र ठरलेले असणे, पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक परीक्षा परिषदेला कळविणे आवश्यक असतांना सुध्दा संबधित शाळेंनी अघापही पात्र विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक कळविलेले नसणे, त्यामुळे परीक्षा परिषदेकडून वारंवार सूचना दिल्यांनतरही संबधित विद्यार्थ्यांच्या शाळांनी तेथील मुख्याधापकांनी या कामाकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष केल्याने राज्यातील तब्बल २२ हजारापेक्षा अधिक विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित असल्याची धक्कादायक माहिती दिनांक १८ फेब्रुवारी, २०२३ रोजी निर्देशनास येणे, यात इयत्ता पाचवीचे वंचित विद्यार्थ्यामध्ये चंद्रपूर ३१९, गडचिरोली १३०, गोंदिया १९२, यवतमाळ ३७७, रायगड २७९, ठाणे ५०२, पालघर २३८, पुणे ८४२, अहमदनगर ५८८, सोलापूर ५३७, नाशिक ५९७, धुळे २२१, जळगाव ४४५, नंदूरबार १८३, कोल्हापूर ४३८, सातारा ३५८, सांगली ३५३, रत्नागिरी १७४, सिंधुदुर्ग ९३, छत्रपती संभाजीनगर ४०३, जालना २१४, बीड ३३९, परभणी १८९, हिंगोली १३९, अमरावती ४३०, बुलडाणा ३३७, अकोला २७०, वाशिम १९१, यवतमाळ ३७७, नागपूर ६९६, भंडारा १७५, वर्धा १६१, लातूर ३३५, धाराशिव २१८, नांदेड ३९०, मुंबई १२५० अशा प्रकारे एकूण १२ हजार ६३३ तर इयत्ता सातवीतील वंचित विद्यार्थ्यामध्ये चंद्रपूर ११३, गडचिरोली ११, गोंदिया १५४, यवतमाळ १९५, रायगड २४८, ठाणे ३६१, पालघर १२९, पुणे ७३६, अहमदनगर ४५२, सोलापूर ४८०, नाशिक ५८७, धुळे २२८, जळगाव २९२, नंदूरबार १६१, कोल्हापूर ३७३, सातारा ३५१, सांगली ३०८, रत्नागिरी १८४, सिंधुदुर्ग १०५, छत्रपती संभाजीनगर ३७५, जालना १७०, बीड २८३, परभणी १३७, हिंगोली १००, अमरावती १८५, बुलडाणा २७१, अकोला १८७, वाशिम १२१, यवतमाळ १९५, नागपूर २८२, भंडारा १३४, वर्धा ६१, लातूर ३११, धाराशिव १९३, नांदेड ३१९, मुंबई ९१५ अशा प्रकारे एकूण ९ हजार ५१५ विघार्थी शिष्यवृत्ती पासुन वंचित असणे, वर्षभर प्रचंड मेहनत घेऊन राज्यातील हजारो मुले शिष्यवृत्तीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेली असणे, असे असतांनासुध्दा शाळेतील मुख्याधापकांच्या दुर्लक्षपणामुळे, दिरंगाईमुळे तब्बल २२ हजारच्या वर विद्यार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या शिष्यवृत्तीपासून वचिंत राहावे लागत असल्याने विद्यार्थ्यासह

पालकांमध्ये पसरत असलेले तीव्र असंतोष व संतापाचे वातावरण, परिणामी या गंभीर प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना".

## मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता आठवी) चे आयोजन दिनांक ३१.०७.२०२२ रोजी करण्यात आले होते. सदर परीक्षेचा निकाल दिनांक ०३.०१.२०२३ रोजी परीक्षा परिषदेमार्फत प्रसिध्द करण्यात आला. त्यानुसार इयत्ता ५ वीचे १६२३२ व इयत्ता ८ वीचे १२९३९ विद्यार्थी असे एकूण २९१७१ विद्यार्थी शिष्यवृत्तीकरीता पात्र ठरले आहेत. सदर पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्याची माहिती संकलित करण्याची कार्यवाही महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत करण्यात आली आहे. मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेतून शिष्यवृत्ती परीक्षा २०२२ मध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची बँक खात्याची माहिती (बँकेचे नाव, खाते क्रमांक व IFSC कोड) व आधार क्रमांकाची माहिती ऑनलाईन पध्दतीने शाळांना दिलेल्या लॉगीनमधून भरावयाची असल्याने त्याबाबतच्या सविस्तर सूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक ०३.०१.२०२३ रोजी देण्यात आल्या आहेत. यानुसार इयत्ता ५ वी च्या १६०३७ विद्यार्थ्यांची व इयत्ता ८ वी च्या १२७६३ विद्यार्थ्यांची अशा एकूण २८८०० विद्यार्थ्यांची (९८.७२%) माहिती प्राप्त झाली आहे. यापैकी इयत्ता ५ वी च्या १३३९४ विद्यार्थ्यांची व इयत्ता ८ वी च्या १०९५० विद्यार्थ्यांची माहिती बरोबर असून या विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्यात आली आहे. उर्वरित विद्यार्थ्यांकडून बरोबर माहिती जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

..............................................................................

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

### लक्षवेधी सूचना क्र. ४४८

श्री. लहु कानडे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" मौजे-टाकळीभान (ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर) येथील शासकीय गट नं.२५०/१ मध्ये एका इसमाने कोणत्याही प्रकारची शासकीय व निमशासकीय परवानगी न घेता अंदाजे १५ फूट रूंद व २० फूट लांब आर.सी.सी. (गाळा) बांधकाम केलेले असणे, या अतिक्रमणाबाबत टाकळीभान ग्रामस्थ यांनी तहसीलदाराकडे निवेदनाद्वारे तक्रार करण्यात येणे, या अतिक्रमण केलेले जागेबाबत मंडळ अधिकारी व तलाठी टाकळीभान यांनी यापूर्वी अहवाल तहसीलदार कार्यालय श्रीरामपूर येथे सादर केलेला असणे, तसेच सदर गट नं.२५०/१ शासकीय असून सदरचे क्षेत्रात ग्रामपंचायत टाकळीभान यांनी बेकायदेशीररीत्या संबंधित इसमास भाडे तत्वावर दिलेली असल्याचे दिसून येणे, त्यानुसार त्या इसमाला श्रीरामपूर तहसील कार्यालयाचे नोटिसद्वारे सदरचे अतिक्रमण काढून घेणेबाबत कळविले असता त्यांनी याबाबत मा. दिवाणी न्यायालय, श्रीरामपूर येथे रे. नं.१९८/२०२२ चा दावा दाखल केलेला असणे, सदर दावा न्यायालयात प्रलंबित असणे, ग्रामपंचायत टाकळीभान यांनी जो शासकीय गट आहे त्या गटातील जागा अनाधिकाराने संबंधित इसमाला भाडेतत्वावर दिलेली असणे, वास्तविक असा कोणताही अधिकार ग्रामपंचायतीस नसल्याने केवळ ग्रामपंचायत टाकळीभान यांनी बेकायदेशीर व्यवहार केल्याने अतिक्रमण व उपोषण, तक्रारी उत्पन्न झाल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, सदर अतिक्रमण निष्कासित करण्यासाठी श्रीरामपूर तहसीलदार कार्यालयाकडून संबंधित इसमास नोटिस देण्यात आलेली असणे, तहसीलदार श्रीरामपूर यांनी सदरच्या जागेचा वाद न्यायालय सुरू असल्याने दुकानाचे उद्घाटन करू नये असा आदेश देण्यात आला असतानाही सदरच्या जागेचे उद्घाटन करण्याचा प्रयत्न संबंधित इसमाने दिनांक २६ जानेवारी २०२३ रोजी सकाळी दहा वाजता करण्यात येणे, सदर सराफानी दुकानाच्या उद्घाटनाच्या सुरक्षेसाठी लेडीज व जेंटस् बाऊन्सर उभे केलेले उघडकीस येणे, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापची लाट निर्माण होणे, काही काळ टाकळीभान येथे अराजकतेचे व गोंधळाचे वातावरण निर्माण होणे, ग्रामस्थ व दुकानाचे कर्मचारी यात खडाजंगी होणे, मा. तहसीलदार श्रीरामपूर यांचे आदेश सदरहू सराफांनी न पाळल्याने टाकळीभान ग्रामस्थांमध्ये झालेली असंतोषाची व चिडीची भावना व त्यातून निर्माण झालेल्या कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न , अशाप्रकारे वर नमूद एका ग्रामपंचायत नव्हे तर राज्यातील अनेक ठिकाणी या प्रकारची कार्यपद्धती वापरून सामाजिक मत्तांचे माफियांकडून होणारे अपहरण आणि वर्षानुवर्षे निवासासाठी घर बांधून राहत असलेल्या गरिबांची अतिक्रमणे कायद्यानुसार नियमानुकूल न करून देणे, यामुळे भूमिहीन बेघरसारख्या गरजूंना किंवा सार्वजनिक हिताच्या कामाला जमीन मिळत नसणे, ग्रामपंचायतकडे मालमत्ता नोंदवही अद्ययावत नसणे, या प्रकारच्या लँड ऑडिट ची गरज असूनही ते होत नसणे, कॅगच्या २०२१ च्या नोव्हेंबर मध्ये पंचायत राज संस्थांच्या आर्थिक परीक्षणात सामाजिक मालमत्ता नोंदवही बाबत मार्गदर्शन केलेले असूनही राज्य शासनाने त्याकडे केलेले दूर्लक्ष याबद्दल शासनाने दोषी विरूद्ध करावयाची कारवाई व द्यावयाची प्रतिक्रिया."

---

### मा. मंत्री ( ग्राम विकास ) यांचे निवेदन

मौजे टाकळीभान (ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर) येथील शासकीय गट नं.२५०/१ हा सरकार महाराष्ट्र राज्य या नावाने असून सदरचा गट हा ग्रामपंचायतीकडे निहीत अथवा वर्ग नाही. या शासकीय गटामध्ये ग्रामपंचायतीने दिनांक ११/०८/२०१७ मध्ये ठराव क्रमांक १२ अन्वये गावातील श्री. गणेश रमेश नागले यांना ग्रामपंचायत शेजारील ट्रॅक्टर शेडची १७ x २९ एकूण ४९३ चौ. फूट इतकी जागा भाडे तत्वावर दिली आहे. सदर जागेचे भाडे ग्रामपंचायतीस मिळत आहे. परंतू, शासकीय गट क्र.२५०/१ हा सरकार, महाराष्ट्र राज्य यांच्या नावाने असल्यामुळे ग्रामपंचायतीने सदर जागा जिल्हाधिकारी किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून कोणतीही परवानगी न घेता आणि प्रत्यक्षात ग्रामपंचायतीला अशा स्वरूपाचे कोणतेही अधिकार नसतानादेखील मासिक सभेतील ठरावानुसार श्री. गणेश नागले

महसूल व वन विभागाकडील प्राप्त माहितीनुसार, विवादीत जागेवरील अतिक्रमणाबाबत गट क्र.२५०/१ मधील ग्रामपंचायतीच्या दक्षिण बाजूने श्री. गणेश रमेश नागले यांनी कोणत्याही शासकीय परवानगी शिवाय अंदाजे १५ x २० फूट बांधकाम केले असल्याबाबतचा अहवाल मंडळ अधिकारी, टाकळीभान यांनी दिनांक २५/०७/२०२२ रोजी तहसिलदार, श्रीरामपूर यांना सादर केला होता. त्यानुषंगाने तहसिल कार्यालयाने दिनांक २५/०७/२०२२ रोजी संबंधित अतिक्रमणकर्ते श्री. रमेश नागले यांना त्यांचे अतिक्रमण स्वत:हून काढून टाकणेबाबत नोटिस दिली होती. सदरहू नोटिशीच्या विरूद्ध संबंधिताने मा. दिवाणी न्यायालय, श्रीरामपूर येथे दिवाणी दावा क्र. १९८/२०२२ दाखल केला असून मा. न्यायालयाने दिनांक २१/०२/२०२३ रोजी सदरचे अतिक्रमण निष्कासित करण्यास दाव्याचा निकाल लागेपर्यंत स्थगिती दिली आहे. त्यामुळे पुढील कार्यवाही महसूल यंत्रणेकडून करण्यात आली नाही. उक्त शासकीय गट क्र.२५०/१ मध्ये संबंधित दुकानदार श्री. पोपट भगीरथ महाले यांनी दिनांक २६/०१/२०२३ रोजी अतिक्रमीत गाळयाचे उद्घाटन करू नये, यासाठी श्री. राजेंद्र रणनवरे यांनी आंदोलनाचा इशारा देणारे पत्र तहसिलदार, श्रीरामपूर यांचेकडे दिनांक २३/०१/२०२३ रोजी प्राप्त झाले होते. सदरची जागा शासनाच्या मालकीची असून त्यावरील गाळयाचे नियोजित उद्घाटन करू नये व तसे केल्यास संबंधितांविरूद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, अशी सक्त नोटिस तहसिल कार्यालयाने श्री. सचिन प्रकाश महाले आणि श्री. ओम सचिन महाले (सराफ) यांना दिली होती. तसेच ग्रामपंचायतीने देखील अतिक्रमित जागेत बांधलेल्या गाळयातील दुकानाचे उद्घाटन स्थगित करावे ; अन्यथा संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, अशी नोटिस श्री. गणेश रमेश नागले यांना दिनांक २५/०१/२०२३ रोजी बजाविली होती. तरी देखील दिनांक २६ जानेवारी २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता विवादीत जागेतील दुकानाच्या उद्घाटनाच्या सुरक्षेसाठी संबंधितांनी लेडीज व जेंटस् बाऊन्सर आणले होते. परंतू, ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी श्री. महाले, संबंधित दुकानदार यांना याबाबत न्यायालयातील प्रकरण प्रलंबित असल्याचे आणि दुकानाचे उद्घाटन करू नये, याबाबत समजावून सांगितल्यानंतर दुकानाचे नियोजित उद्घाटन रद्द करण्यात आले.

त्यानंतर मा. न्यायालयाच्या आदेशाचा गैरफायदा घेऊन त्रयस्थ व्यक्तीस हक्क प्राप्त होतील असे कोणतेही कृत्य करू नये अशा आशयाची नोटिस ग्रामपंचायतीने श्री. गणेश रमेश नागले यांना दिनांक २२/०२/२०२३ रोजी दिली आहे.

सार्वजनिक / शासकीय / गायरान ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या धोरणात सुधारणा करण्याबाबतचा निर्णय राज्य शासनाने दिनांक १६/०२/२०१८ च्या शासन निर्णयान्वये घेतला आहे. त्यानुसार सर्वसाधारण गायरान जमिनी, सार्वजनिक वापरातील जमिनी व वन क्षेत्र तसेच ज्या जमिनींवर वास्तव्य करणे शक्य नाही अशा जमिनी वगळून इतर शासकीय जमिनींवरील दिनांक ०१/०१/२०११ पर्यंतची ग्रामीण गृह निर्माण योजनेंतर्गत लाभार्थ्यांनी निवासी प्रयोजनार्थ केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा निर्णय घेतला आहे. सदरच्या धोरणानुसार, अतिक्रमण नियमानुकूल करण्यासंदर्भात राज्य शासनाने विकसित केलेल्या संगणक प्रणालीवरील माहितीनुसार राज्यात आतापर्यंत ५७७५३३ एवढी अतिक्रमणांची नोंद असून त्यापैकी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वीकृत केलेल्या ४०५६७ नोंदी असलेले अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

महसूल विभागाने दिनांक १२/०७/२०११ च्या शासन निर्णयान्वये गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरासाठी ग्राम पंचायतीकडे निहीत केलेल्या गायरान जमिनी तसेच गावाच्या सार्वजनिक वापरातील जमिनीवरील अन्य प्रयोजनासाठी झालेली अतिक्रमणे किंवा अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी (ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, इ.) महसूल यंत्रणेच्या मदतीने विशेष कृती कार्यक्रम आखण्यासंदर्भात सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार गायरान/शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी महसूल विभागाने विभागाकडून स्थानिक यंत्रणा जसे की ग्रामपंचायतीच्या मदतीने कार्यवाही करावयाची असते. ग्रामपंचायत लेखा संहिता, २०११ अंतर्गत ग्रामपंचायतीने जतन व अद्ययावत करावयाच्या सर्व नोंदवह्यांचे संगणकीकरण करण्यासाठी विकसित केलेल्या ई -ग्रामसॉफ्ट या संगणक प्रणालीचा विभागाच्या शासन निर्णय दि.२४/०१/२०१८ अन्वये अवलंब करण्यात आला असून त्याप्रमाणे स्थावर मालमत्तेच्या सर्व नोंदी भरून अद्ययावत केल्या जातात. कॅग च्या २०२१ च्या नोव्हेंबर मध्ये पंचायत राज संस्थांच्या आर्थिक परीक्षणात सामाजिक मालमत्ता नोंदवही बाबत केलेल्या मार्गदर्शनाबाबत या विभागाकडून सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्यात येतील.